www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ युवकांनो स्वयमशिस्त जोपासा - डॉ. उदय...

पान ३ वर....

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ मुंबई विद्यापीठाचे ढिसाळ नियोजन, तांत्रिक...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १७० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, १९ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# निर्भय व मुक्त वातावरणात मतदान प्रक्रियेसाठी सुरक्षा यंत्रणा सज्ज -जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे

## केंद्रीय व स्थानिक सुरक्षा यंत्रणांचा आढावा संपन्न

● **ठाणे, यश सावंत :**

ठाणे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात निर्भयपणे, मुक्त वातावरणात मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन, स्थानिक पोलीस यंत्रणा व केंद्रीय सुरक्षा दलाचे जवान सज्ज आहेत. मतदानादिवशी मतदान केंद्रांवर कोणतीही गर्दी होणार नाही व सर्व मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे, यासाठी सर्व केंद्रीय सुरक्षा यंत्रणा तसेच स्थानिक पोलीस यंत्रणांनी दक्ष राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच मतदानासाठी येणाऱ्या नागरिकांना मतदान केंद्रात मार्गदर्शन करून त्यांचे मतदान जलदगतीने होईल, याकडे लक्ष द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे दिले.



जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच मतदान केंद्र व मतमोजणी केंद्राच्या ठिकाणावरील विषयाबाबतची आढावा बैठक कार्यालयाच्या समिती सभागृहात पार पडली. या बैठकीस संबंधित सर्व केंद्रीय निवडणूक निरीक्षक, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी. स्वामी, आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी विजयसिंह देशमुख, कायदा व सुव्यवस्था नोडल अधिकारी दीपक क्षीरसागर यांच्यासह सशस्त्र पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, गुजरात पोलीस, गोवा पोलीस, छत्तीसगड पोलीस दलाचे अधिकारी उपस्थित होते.

स्थानिक पोलीस दलाबरोबरच मतमोजणी केंद्रांवर तसेच मतदान केंद्रांवर केंद्रीय सुरक्षा दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. या जवानांनी मतदान केंद्रावर गर्दी होऊ नये, यासाठी काळजी घ्यावी. सर्व नागरिकांना तसेच मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांच्या मदतीने मतदान खोलीमधील व्यवस्थापन सुरळीत होईल, याकडे लक्ष देण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. मतदानासाठी रांगेचे व्यवस्थापन तसेच गर्दीचे व्यवस्थापन करताना स्थानिक पोलीस यंत्रणांबरोबरच केंद्रीय सुरक्षा यंत्रणाची मदत होईल. तसेच संवेदनशील व गर्दी होणाऱ्या मतदान केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आले असल्याचे श्री. शिनगारे यांनी यावेळी सांगितले.

पान २ वर

# शाळांच्या सुट्टीबद्दल शिक्षण आयुक्तालय आणि महापालिकेचा परस्परविरोधी निर्णय

● **मुंबई, यश सावंत :**

मतदानाच्या दोन दिवस आधी शाळांना सुट्ट्या देण्यावरून गोंधळ उडालेला असताना आता आणखी एका पत्रकामुळे संभ्रम वाढला आहे. सर्व शिक्षकांची निवडणूक कामासाठी नियुक्ती झाली असल्यास नजीकच्या शाळेतील शिक्षकांची नियुक्ती करून १८ आणि १९ नोव्हेंबरला या शाळा सुरू ठेवाव्यात, अशी सुधारित सूचना शिक्षणआयुक्तालयाने जारी केली आहे. तर मतदान केंद्र असलेल्या मुंबई महापालिकेच्या शाळांना मात्र १९ नोव्हेंबरला सुट्टी देण्यात आली आहे.

महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले की, मतदार केंद्र असलेल्या शाळांना १९ नोव्हेंबरला सुट्टी दिली आहे. दुसरीकडे शिक्षण आयुक्तालयाच्या नव्या पत्रकाने आणखी गोंधळ वाढविला आहे.

यापूर्वीच्या पत्रकात ज्या शाळेतील शिक्षकांची नियुक्ती निवडणुकीसाठी झाली आहे, त्या शाळा १८ व १९ ला बंद



ठेवण्याबाबत मुख्याध्यापकांनी निर्णय घ्यावा, असे म्हटले होते. त्यामुळे या शाळांना दोन दिवस सुट्ट्या दिल्या जातील, असा समज झाला.

मात्र, आयुक्तालयाने दुसरे पत्र जारी करत ज्या शाळेतील सर्व शिक्षक निवडणूक कामात व्यग्र असतील, अशाच शाळांसाठी ही सूचना असून, इतर शाळा सुरूच राहतील, असे स्पष्ट केले होते. मात्र तिसऱ्या पत्रकाने नवा गोंधळ उडाला आहे.

राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळा या १८ व १९ नोव्हेंबर रोजी सुरू राहतील, याचे नियोजन गटशिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित मुख्याध्यापकांच्या मदतीने करावे, असे शिक्षण आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.

**दुसऱ्या दिवशी सुट्टी हवी!**

निवडणुकीचे काम करणाऱ्या शिक्षकांना मतदानाच्या दुसऱ्या दिवशी सुट्टी देण्यात यावी, अशी मागणी आहे. शिक्षकांना निवडणूक साहित्य व मतदान यंत्रे ताब्यात घेण्याकरिता मंगळवारी सकाळी ८ वाजता कार्यालयात उपस्थित राहावे लागणार आहे. त्या दिवशी तेथेच मुक्काम करून २० तारखेला पहाटे ५ वाजता निवडणूक कामासाठी उपस्थित राहावे लागणार आहे.

## प्रचारसभेहून परतत असताना वाहनावर दगडफेक; अनिल देशमुख जखमी

● **नागपूर, नितीन देवळेकर :**



राज्याचे माजी गृहमंत्री आ. अनिल देशमुख यांच्या गाडीवर अज्ञात व्यक्तीने दगडफेक केल्याची घटना सोमवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास घडली. या हल्ल्यात देशमुख गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार काटोल मतदार संघातील नरखेड येथील सांगता सभा आटपून अनिल देशमुख हे तीनखेडा भिष्णुर मार्गाने परत येत असताना काटोल-जलालखेडा रोडवरील बेलफाट्याजवळ काही व्यक्तींनी त्यांच्या गाडीवर दगडफेक केली. यात त्यांच्या डोक्याला गंभीर गंभीर दुखापत झाल्याची माहिती आहे. त्यांना उपचारासाठी काटोल येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले आहे. रुग्णालयाबाहेर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे.

## "कुटुंबातील महिलांमध्ये वाद निर्माण करण्याची काँग्रेसची योजना", 'गृहलक्ष्मी'वरून चित्रा वाघ यांचा निशाणा

● **मुंबई, धनश्री सट्टा :**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आहे. अशात महाराष्ट्रातकाँग्रेस सत्तेत आल्यास कुटुंबातील एकाच महिलेला लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळेल. मात्र, महाराष्ट्रात महायुतीचे सरकार एकाच घरात ३ महिला असतील तरी सर्वांना पैसे देतंय, असे भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.

"कर्नाटकमधील काँग्रेस सरकारमधील महिला आणि बालविकास मंत्री स्वतः कबूल करतात की कर्नाटकात गृहलक्ष्मी योजनेचा (लाडकी बहीण योजनेसारखी) काँग्रेस एका 'कुटुंबातील फक्त एकाच महिलेला' लाभ देत आहे. म्हणजे सासू, सून आणि नणंद पैकी एकालाच लाभ द्यायचा आणि कुटुंबातील महिलांमध्ये वाद विवाद आणि स्पर्धा निर्माण करण्याचीच ही काँग्रेसची योजना



आहे", असा आरोप चित्रा वाघ यांनी केला आहे.

दरम्यान, महायुती सरकारने राज्यात सुरु केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना विरोधकांच्या डोळ्यात खुपत असल्याचा आरोप यापूर्वी चित्रा वाघ यांनी केला होता. लाडकी बहीण योजनेमुळे अनेक महिलांना सक्षम होत असून त्यांना छोट्या- मोठ्या व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करुन दिले असल्याचे त्यांनी म्हटले होते.

पान २ वर

# गुजरातवरून मीरारोडला आलेल्या तरुणाकडे सापडल्या ५१ लाखाच्या बनावट नोटा

● **भाईंदर, सतीश सोनावणे :**

निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली असताना गुजरातवरून मीरा रोडला आलेल्या तरुणाकडे ५१ लाख ७० हजार रुपयांच्या बनावट नोटा सापडल्या सापडल्याने एकच खळबळ उडाली. या नोटा मतदारांना वाटण्यात येणार होत्या का? या नोटा नेमके कोणी मागवल्या, तो नोटा कोणाला देणार होता याचा पोलीस तपास घेत आहेत.

पोलीस निरीक्षक हितेंद्र विचारे आणि मनोहर तावरे यांना बनवाट नोटा गुजरातहून येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. १५



तारखेला ०३.०० च्या सुमारास डॉन बास्को स्कुल जवळ, मुन्शी कपाऊन्ड, प्रेझेन्ट पार्क रोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर, मिरारोड पुर्व येथे बॅगेमध्ये ५०० रुपयांच्या बनावट नोटा वितरीत करण्यासाठी घेवून येणार असल्याची माहिती मिळाली होती.

या टोळीला पकडण्यासाठी पोलिसांनी सापळा लावला. मीरारोडच्या प्लेझंट पार्क ते मुन्शी कम्पाउंडकडे जाणाऱ्या रस्त्यावर आर्यन मनसुखभाई जाबूचा याच्या पोलिसांनी मुस्क्या आवळल्या. त्याच्याकडून ५०० रुपयांच्या १०,३५२ बनावट नोटांची ५३ बंडले सापडली. या ५१ लाख ७० हजार रुपये किमतीच्या बनावट नोटांसह दोन मोबाइल फोनही जप्त केले.

मूळ गुजरातचा राहणारा आर्यन मनसुखभाई जाबूच्या डोक्यावर कर्ज झालं होतं . त्यामुळे त्याने सुरुवातीला एक प्रिंटर घेतला मात्र नोटा व्यवस्थित हुबेहूब दिसत नव्हते. त्याने दुसरा ऑफसेट प्रिंटिंग मशीन खरेदी केली. त्या मशीनद्वारे भारतीय चलनातील बनावट नोटा छापून त्याने त्याचाच मित्र असलेल्या उल्हासनगरला त्याच्या एका फ्लॅटवर नोटा ठेवण्यात आल्या होत्या.

तो गुजरात मध्ये छपाई करून मुंबईमध्ये चीटर लोक दुप्पट पैसे देणाऱ्या लोकांना हेरायचं त्या लोकांना तो बनावट नोटा देण्याच्या इराद्यामध्ये होता. सध्या निवडणुकीची धामधूम असल्याने मतदारांना आकर्षित करण्यासाठी या बनावट नोटांचा वापर करता येईल या उद्देशाने तो आला असावा असा पोलिसांचा कयास आहे. आर्यन याने मीरा-भाईंदर मध्ये एक लॉज बुक केला होता आणि त्या ठिकाणी तो राहत असे. उल्हासनगरचा मित्र त्याच्या एका फ्लॅटमध्ये छपाई केलेले पैसे ठेवत असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिले आहे.


# सत्तास्थापनेत राज ठाकरेंची भूमिका महत्त्वाची, बाळा नांदगावकर यांनी केला दावा

● **मुंबई, विशाल पाटील**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) उमेदवार बाळा नांदगावकर म्हणाले की, आगामी राज्य विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर उदयास येणाऱ्या 'सत्ता समीकरणां'मध्ये पक्षप्रमुख राज ठाकरे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

नांदगावकर यांनी पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत मुंबईच्या मर्यादित जमिनीचा आणि लोकसंख्येच्या घनतेचा उल्लेख करताना सांगितले की, त्यांच्या पक्षाची भूमिका उत्तर प्रदेश, बिहार किंवा इतर राज्यांतील लोकांच्या विरोधात नाही आणि शिवडी मतदारसंघासाठी मागील आंदोलनात कोणतेही नुकसान झाले नाही तो मनसेचा उमेदवार आहे त्या भागातील कोणीही असो.

बाळा नांदगावकर पुढे म्हणाले की, मनसे आणि पक्षप्रमुख राज ठाकरे हे दोघेही आगामी काळात राजकीयदृष्ट्या उदयास येतील. मनसेने २००९ च्या निवडणुकीत (२८८ पैकी)



१३ विधानसभा जागा जिंकल्या होत्या, ही पक्षाची पहिली राज्य विधानसभा निवडणूक होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेने एक जागा जिंकली होती. पक्षाने या वर्षाच्या सुरुवातीला लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला पाठिंबा दिला होता, परंतु २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अपक्ष उमेदवार म्हणून लढवत आहे.

चार वेळा आमदार राहिलेले बाळा नांदगावकर मध्य मुंबईतील लालबाग येथील मनसेच्या कार्यालयात म्हणाले, "या निवडणुकीत तुम्हाला अनेक लोक घरी बसतील (पराभवतील) आणि चांगले लोक राजकारणात उतरतील. तसेच या विधानसभा निवडणुकांनंतर सत्तेच्या नव्या समीकरणांमध्ये राज ठाकरे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. नांदगावकर हे शिवसेनेचे (UBT) उमेदवार आणि विद्यमान आमदार अजय चौधरी यांच्या विरोधात निवडणूक लढवत आहेत, जे तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. चौधरी यांनी २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत नांदगावकर यांचा पराभव केला होता.

## एरोलीमध्ये गुंडशाहीविरोधात अंकुश कदम यांना साथ द्या - संभाजीराजे छत्रपती

● **ठाणे, रोहित जैसवार :**

एरोली मतदारसंघात अंकुश कदम यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत संभाजीराजे छत्रपती बोलत होते."स्वराज्य संघटना असताना याठिकाणी मी जेव्हा आलो, तेव्हाच मी तुम्हा सर्वांना शब्द दिला होता की, इथल्या गुंडशाहीविरुद्ध मी तुमच्यासोबत आहे.

गुंडशाही मोडून काढण्यासाठी आणि सामान्य लोकांना भयमुक्त करण्यासाठी तुम्ही अंकुश कदम यांना आपला प्रतिनिधी म्हणून विधानसभेत नक्की पाठवाल," असे ते म्हणाले.

"मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जो प्रदीर्घ लढा सुरू आहे, त्या लढ्यात अंकुश कदम माझ्यासोबत कायम कार्यरत आहेत. मराठा समाजाला ५०%च्या आत आरक्षण देण्याची



भुमिका घेणारा स्वराज्य पक्ष हा एकमेव पक्ष आहे. इतर पक्ष फक्त आरक्षणाचे गाजर दाखवून राजकारणासाठी मराठा समाजाला आणि इतर समाजाला सुध्दा फसवत आहे आहेत.

माथाडी कामगारांचे प्रश्न आणि काही ठराविक बिल्डरांच्या हितासाठी पर्यावरणाचा विचार न करता चाललेले व्यवहार बंद करण्यासाठी स्वराज्य पक्ष कटिबद्ध आहे, असे ते म्हणाले.

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# विज्ञान आणि तंत्रज्ञान

मागील काही दशकांचा जर आपण विचार केला, तर या दशकांत विज्ञानाची प्रगती ही फार अचंबित करणारी आहे. आपल्याला असाध्य वाटणाऱ्या अनेक गोष्ट, विज्ञानाने साध्य करून दाखवल्या आहेत. २१वे शतक तर 'विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे' शतक म्हणूनच ओळखले जाते. या शतकाच्या आरंभीच म्हणजे, २००१ पासून 'जागतिक विज्ञान दिवस' साजरा करायला सुरूवात केली. १९९९ साली 'यूनेस्को' आणि 'आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषद' यांच्या संयुक्त विद्यमाने हंगेरी इथल्या आंतरराष्ट्रीय बैठकीत, 'विज्ञानाचा समाजजीवनावर परिणाम आणि त्याविषयी जनजागृती' या विषयावर चर्चा करण्यात आली. विज्ञानाला आपल्या दैनंदिन व्यवहाराशी अधिकाधिक जोडणे, जगाच्या विकासात आणि जगभरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी विज्ञान कसे प्रभावी ठरू शकते याचा विचार करणे, जागतिक दारिद्र्य, पर्यावरण, आरोग्य यांसारख्या समस्या विज्ञानाच्या साहाय्याने सोडवण्याचा हेतू आहे.

यूनेस्कोच्या मुख्य कार्यालयात, विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतात. २०२३ साली यूनेस्कोने 'बिल्डिंग ट्रस्ट इन सायन्स' म्हणजेच, 'विज्ञानावरचा विश्वास' हा विषय निवडला होता. ''जागतिक आव्हानांचा सामना करताना, विज्ञानावर विश्वास ठेवायला हवा' हा विचार लोकापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि विज्ञानाचा गैरवापर आताच्या काळात वाढलेला असताना, योग्य काय आणि अयोग्य काय हे विवेकबुद्धीने लोकांना ठरवता यावे, यासाठी यूनेस्कोने हा विषय निवडला होता. २०२४ सालीही युनेस्को 'जागतिक विज्ञान दिना'साठी कोणता विषय निवडणार,याकडे विज्ञानविश्वाचे लक्ष लागून राहिले होते. यावर्षी यूनेस्कोने 'व्हाय सायन्स मॅटर्स-एनोजिंग माइंडस अॅण्ड एम्पावरिंग फ्यूचर्स' हा विषय निवडला होता. या विषयांतर्गत, एक वेबिनार यूनेस्कोच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. यावर्षी तरुण मुलांना अधिकाधिक सहभागी करून घेणे, हा युनेस्कोचा उद्देश होता. त्यासाठी 'यूनेस्को यूथ फोरम आणि सायन्स यूथ नेटवर्क'च्या माध्यमातून, प्रयत्न करण्यात आले होते. सामान्यांना लक्षात घेऊन, यूनेस्कोने यावर्षीचा कार्यक्रम आयोजित केला होता. तरुणांना त्यांच्या मनातील विज्ञानाविषयीचे प्रश्न दिग्गज वैज्ञानिकांना विचारता येतील , अशी सोय या कार्यक्रमात युनेस्कोने केली होती. हा कार्यक्रम ऑनलाइन असल्यामुळे, तो जगभरातील प्रेक्षकांसाठी खुला होता.

लवकरच आकाशही ठेंगणे पडेल, इतकी उंच भरारी विज्ञान दररोज घेत आहे. नवनवीन शोध दररोज लागत आहेत. आपल्या वैयक्तिक आयुष्याचा जर आपण विचार केला, तर आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग झालेला, आपल्या हातातील मोबाईल असो किंवा आपल्या रोजच्या वापरातील इतर कोणतेही यंत्र असो,सर्वत्र विज्ञानाचा प्रभाव आहे. मानवी जीवन आणि विज्ञान हे इतके एकरूप झालेले आहे की, विज्ञानाशिवाय जगण्याची कल्पनाही आपल्याला भयावह वाटते. या विज्ञानाने आपले जीवन सुखकर केले आहे हे जितके खरे आहे, तितकेच या विज्ञानाचा गैरवापर केला तर होणारे दुष्परिणामही भीषण आहेत. म्हणून विज्ञानाचा वापर कसा करावा हे शिकून घेताना, त्याचा वापर कसा करू नये याबद्दल जागृत राहिले पाहिजे. विज्ञानाची प्रगती ही काही खुंटीत होणारी नाही, ती प्रत्येक दिवसागणिक वाढतच जाणार आहे. प्रत्येक दिवशी विज्ञानाविषयी जनजागृती होणे महत्वाचे आहे. कारण, विज्ञानाचा विवेकाने वापर केला, तरच ते आपल्यासाठी वरदान ठरणार आहे.

# सामाजिक बांधिलकी जपणारा पुरुष प्रधान !!



प्रविण बागडे
नागपूर

आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा पुरुषांना तोंड द्यावे लागणाऱ्या अनेक समस्यांसाठी जागतिक जागरुकता दिन आहे, ज्यात पालकांचा अलिप्तपणा, अत्याचार, बेघरपणा, आत्महत्या आणि हिंसाचार यांचा समावेश आहे. दरवर्षी हा दिवस १९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. जेव्हा प्रत्येक दिवस पुरुषप्रधान मानला जाऊ शकतो तेव्हा पुरुषांना जागरुकता दिवसाची गरज कां आहे? असा प्रश्न अनेकांना पडेल. अधिकृत दिवसांमध्ये 'अंडरडॉग'ची कबुली दिली जाते आणि म्हणूनच हा नोव्हेंबरचा उत्सव भुवया उंचावत आहे. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे सर्व सहा स्तंभ'. मुलांचे आणि पुरुषांचे जीवन, कर्तृत्व आणि योगदान, विशेषत: राष्ट्र, संघ, समाज, समुदाय, कुटुंब, विवाह आणि बालसंगोपन यातील त्यांच्या योगदानाबद्दल साजरे करण्याचा हा एक प्रसंग आहे.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची उद्दिष्टे सकारात्मक पुरुष आदर्शांना प्रोत्साहन देण्यासाठी; केवळ सिनेतारक आणि क्रीडापुरुषच नव्हे तर दैनंदिन, श्रमिक वर्गातील पुरुष जे सभ्य, प्रामाणिक जीवन जगत आहेत. समाज, समुदाय, कुटुंब, विवाह, मुलांची काळजी आणि पर्यावरणात पुरुषांचे सकारात्मक योगदान साजरे करण्यासाठी, पुरुषांच्या आरोग्यावर आणि आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी: सामाजिक, भावनिक, शारीरिक आणि आध्यात्मिक, सामाजिक सेवा, सामाजिक दृष्टीकोन आणि अपेक्षा आणि कायदा या क्षेत्रांमध्ये पुरुषांवरील भेदभाव हायलाइट करण्यासाठी, लैंगिक संबंध सुधारण्यासाठी आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी, एक सुरक्षित, उत्तम जग निर्माण करण्यासाठी, जिथे लोक सुरक्षित राहू शकतील आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचू शकतील.

जरी आंतरराष्ट्रीय पुरुष आणि महिला दिन हे 'लिंग-केंद्रित' कार्यक्रम मानले जात असले तरी ते वैचारिक आरशातील प्रतिमा नाहीत कारण ते पुरुष किंवा स्त्रियांसाठी अद्वितीय मानल्या जाणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकतात. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा इतिहास प्रामुख्याने पुरुष आणि मुलांच्या अनुभवांसाठी अनन्य समजल्या जाणाऱ्या समस्यांशी संबंधित आहे, तसेच सकारात्मक रोल मॉडेल्सवर भर दिला जातो, जे विशेषतः 'सामाजिक संदर्भात आवश्यक मानले जाते जे सहसा पुरुषांच्या प्रतिमांनी आकर्षित होते. वाईट वागणे, सकारात्मक पुरुष रोल मॉडेल्स हायलाइट करताना आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा हे दाखवण्याचा प्रयत्न करते की सर्व वयोगटातील पुरुष सकारात्मक रोल मॉडेल्सपेक्षा जास्त उत्साही प्रतिसाद देतात ते नकारात्मक स्टिरिओटाइपिंग करतात.' इतर पुरुष हक्क कार्यकर्त्यांनी आयएमडीच्या निमित्ताने प्रश्न विचारले, कौटुंबिक हिंसाचार आणि मुलांचा ताबा या कायद्यांमध्ये लैंगिक तटस्थतेच्या अभावावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ऑल इंडिया मेन्स वेल्फेअर असोसिएशनच्या चेन्नई चॅप्टरने आयएमडी २०१४ वर सरकारला एक निवेदन सादर केले होते, ज्यामध्ये पुरुष कल्याण मंत्रालय, राष्ट्रीय पुरुष आयोग स्थापन करण्याची आणि सर्व कायदे लिंग तटस्थ बनविण्याची मागणी केली.

थॉमस ओस्टर यांनी ७ फेब्रुवारी १९९२ रोजी उद्घाटन केले, आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या प्रकल्पाची संकल्पना एक वर्षापूर्वी म्हणजे ८ फेब्रुवारी १९९१ रोजी करण्यात आली. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा सर्वात जास्त काळ चालणारा उत्सव माल्टा आहे, जेथे ७ फेब्रुवारी १९९४ पासून घटना घडल्या आहेत. माल्टा हा एकमेव देश होता ज्याने फेब्रुवारीची तारीख साजरी केली आणि समाजातील त्यांचे योगदान, माल्टीज ए.एम.आर. समितीने २००९ मध्ये आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची तारीख १९ नोव्हेंबर वर हलवण्यासाठी मतदान केले. जेरोम तेलुकसिंग, ज्याने या कार्यक्रमाचे पुनरुज्जीवन केले, त्याने १९ नोव्हेंबर हा दिवस आपल्या वडिलांच्या वाढदिवसाच्या सन्मानासाठी निवडला आणि त्या तारखेला १९८९ मध्ये त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या फुटबॉल संघाने विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र होण्याच्या त्यांच्या प्रयत्नांनी देशाला कसे एकत्र केले ते साजरे करण्यासाठी. तेलुक्सिंग यांनी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा केवळ लिंगनिहाय दिवस म्हणून नव्हे तर पुरुष आणि मुले यांना प्रभावित करणाऱ्या सर्व समस्यांवर उपाय म्हणून प्रचार केला आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन आणि त्याच्या तळागाळातील कार्यकर्त्यांबद्दल म्हटले आहे, 'ते लैंगिक समानतेसाठी प्रयत्नशील आहेत आणि आपल्या समाजातील नकारात्मक प्रतिमा आणि पुरुषांशी संबंधित कलंक दूर करण्याचा संयमाने प्रयत्न करत आहेत'.

भारतातील आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची चा उद्घाटन सोहळा १९ नोव्हेंबर २००७ रोजी अग्रगण्य भारतीय पुरुष हक्क संस्था इंडियन फॅमिली द्वारे आयोजित करण्यात आला होता. १९ नोव्हेंबर ही तारीख ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज या वस्तुस्थितीवर आधारित स्वीकारण्यात आली होती. त्या तारखेला आधीच आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे निरीक्षण करत होते. २००८ मध्ये भारतात हा कार्यक्रम पुन्हा साजरा करण्यात आला आणि दरवर्षी हा उत्सव सुरू ठेवण्याची योजना आखण्यात आली. २००९ 2009 मध्ये भारताला आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे पहिले कॉर्पोरेट प्रायोजकत्व प्राप्त झाले, ज्यामध्ये पुरूषवेअर ब्रँड अॅलन सॉलीने आंतरराष्ट्रीय पुरुष दिनावर प्रचारात्मक ऑफर तयार करण्याचा निर्णय घेतला आणि होम बॉक्स ऑफिसने १९ नोव्हेंबर रोजी त्याच्या 'मेन इन ब्लॅक' मालिकेत पुरुष-पॉझिटिव्ह चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला. २०१४ मध्ये कॉन्फिडेअर एज्युकेशन कन्सल्टन्सीने नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय पुरुष दिनावर आर्ट गॅलरी आयोजित केली होती, तर कोलकाता येथे पुरुषांचे हक्क आणि वृद्धांच्या गैरवापरावर प्रकाश टाकण्यासाठी निदर्शने करण्यात आली होती.

२०१८ मध्ये पुरुषांसाठी एक कल्याणकारी आणि धर्मादाय ट्रस्ट, कायद्यातील लैंगिक तटस्थता, भारतातील पुरुष आयोग, भारतीय दंड संहितेचे कलम ४९८ (ए) रद्द करणे आणि बलात्कार कायद्याच्या गैरवापरावर कठोर कारवाई या मागण्यांसाठी कोलकाता येथे आंदोलन आयोजित केले. २०१९ मध्ये बंगळुरूच्या दोन प्रमुख रुग्णालये, एस्टर हॉस्पीटल्स आणि रिगल हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रोस्टेट कर्करोगाच्या जनजागृतीवर 'हेल्दी हिम' मोहीम राबवली. २०१७ आणि २०१८ मध्ये इतर अनेक जनजागृती उपक्रमांबरोबरच, स्वयंसेवकांनी नंदी हिल्स, भारत येथे बाईक रॅली काढली आणि ४०,००० हून अधिक लोक उपस्थित असलेल्या आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा केला. दामन वेल्फेअर सोसायटी अँड ट्रस्ट, सेव्ह इंडियन फॅमिली मूव्हमेंट अंतर्गत याच मुख्याध्यापकांवर काम करणारी आणखी एक प्रमुख एनजीओ देखील दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा करते. २०१९ मध्ये त्याने कानपूरमधील रेव्ह ३ मॉलमध्ये एक दिवसभर भव्य कार्यक्रम आयोजित केला आणि आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त जागरुकता निर्माण केली. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या विपरीत, आंतरराष्ट्रीय पुरुष दिन अधिकृतपणे संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे मान्यताप्राप्त नाही. सर्व पुरुषांना आज आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !

# मतदान जनजागृतीपर विद्यार्थ्यांनी काढली प्रभातफेरी !

**वासिंद (रोहित जैसवार)** - स्वीप कार्यक्रम अंतर्गत मतदारांना जागृत करून मतदान वाढावे यासाठी ग.वि. खाडे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शहापूर शहरातून प्रभात फेरी काढून जनजागृती केली. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी ठाणे यांच्या मार्गदर्शनानुसार व शहापूर तहसीलदार यांच्या देखरेखीखाली आज दि. सोमवार 18 नोव्हेंबर रोजी ग.वि. खाडे विद्यालयातील अकरावी व बारावीच्या जवळपास सातशे-आठशे




विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी सहभाग घेत शहरात प्रभातफेरी काढून नागरीकांमध्ये मतदान करण्या विषयी जनजागृती करण्यात आली असल्याचे नोडल अधिकारी प्राध्यापक दिगंबर खरात यांनी म्हटले.

यावेळी तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी उपस्थिती दर्शवून मतदानाचा टक्का वाढावा यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या गांवपाड्यातील मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करावे असे मार्गदर्शन केले तर शिक्षण विस्तार अधिकारी प्राजक्ता राऊत यांनी स्वीप कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर काढलेली प्रभात फेरी मतदारांना मतदान करण्याविषयी ही उपयुक्त ठरेल असा आशावाद व्यक्त केला. यामध्ये नागरिक, व्यापारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला या कार्यक्रमावेळी प्राचार्य ज्ञानेश्वर तळपाडे उपप्राचार्य रवींद्र खरात, नोडल अधिकारी प्राध्यापक दिगंबर खरात व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# महा रांगोळीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी साकारला मानवी रांगोळीचा महाराष्ट्राचा महा नकाशा

**पालघर (सुचिता देशमुख) :** स्वीपच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम जिल्हाभर राबविले जात आहेत . त्याचाच एक भाग म्हणून आर्यन शाळेच्या मैदानावर १८० × १५६ म्हणजे २८०८० स्क्वेअर फुट महाराष्ट्राचा महा नकाशा काढून मानवी रांगोळी तयार केली.यासाठी म. नि. दांडेकर हायस्कूल , पालघर, आर्यन इंग्लिश मीडियम हायस्कूल , पालघर,माध्यमिक विद्यालय भगिनी समाज,पालघर मधील या तीन शाळांचे एकूण १५५६ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. या तिन्ही शाळांचे सहकार्य मतदार जनजागृतीसाठी मिळाले.




जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. गोविंद बोडके यांनी महारांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्याबाबतच्या संकल्पनेचे कौतुक करत स्वीप विभाग, रांगोळी काढणारे कलाशिक्षक, सहभागी शाळा, मुख्याध्यापक या सर्वांचे कौतुक करत विद्यार्थ्यांना संकल्प पत्राची आठवण करून देत व पालक , नातेवाईक, शेजारी यांना मतदान करण्यासाठी आठवण करून देण्यास सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की सर्वांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याबाबत मार्गदर्शन केले त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपल्या ओळखीच्या लोकांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा स्वीप नोडल अधिकारी विजया जाधव यांनी जिल्ह्यातील विविध उपक्रमांची माहिती देत आजचा महारांगोळीचा उपक्रम विशेष असल्याचे सांगून मतदान जनजागृती सोबतच या नकाशाचा आकार व सहभागी विद्यार्थी संख्या पाहता रेकॉर्डसाठी सुद्धा आपण प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले व मतदान करण्यासाठी पालकांना विद्यार्थ्यांनी सांगावे आवाहन त्यांनी केले.

यानंतर ही रांगोळी साकारणाऱ्या कला शिक्षकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी रवींद्र हजारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संगीता भागवत ,शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) सोनाली मातेकर, महारांगोळीसाठी समन्वयकाची भूमिका साधणारे शिक्षक सुशील शेजुळे, म.नि.दांडेकर हायस्कूल मुख्याध्यापिका जान्हवी घरत मुख्याध्यापिका माध्यमिक विद्यालय भगिनी समाज, प्रिती वर्तक व महारांगोळी काढणारे कलाशिक्षक प्रवीण अवतार, ज्ञानेश्वर माळी, भास्कर खेडकर, प्रितम घरत, सिताराम प्रभू, उज्वल पारगावकर, बँड पथकाचे प्रमुख शिक्षक समीर पिंपळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शन भंडारे यांनी केले.

# श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान ऑनलाईन सिंहासन पुजा, नोंदणी करण्याचे आवाहन

**धाराशिव (नितीन देवळेकर)** - महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी देविच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश,कर्नाटक, तेलंगना व इतर राज्यातून भाविक कुलदेवता असल्याने या ठिकाणी कुलाचार व कुलधर्म करण्यासाठी मोठ्या संख्येने येतात.

श्री देविजीची सिंहासन पुजा ही अत्यंत महत्वाची मानली जाते. ही सिंहासन पुजा नोंदणी ऑनलाईन पध्दतीने श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर https://shrituljabhavani.org उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

डिसेंबर २०२४ मधील सिंहासन पुजा ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येईल याची सर्व भाविक भक्त,महंत, पुजारी,सेवेकरी व नागरीकांनी नोंद घ्यावी.भाविकांनी सिंहासन पुजा श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अधिकृत संकेतस्थळ https://shrituljabhavani.org यावरून सिंहासन पुजा पास बुकींग या मेन्युवर क्लिक केल्यानंतर https://shrituljabhavanimataseva.org या लिंकवर प्रवेश करून भाविकांनी आपली सिंहासन पुजेची नोंदणी करावी. सिंहासन पुजा नोंदणी २१ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.ती २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करता येईल.ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने प्रथम सोडत व भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस २७ नोव्हेंबर २०२४ रोजी १०.३० वाजता पाठविण्यात येतील.भाविकांनी प्रथम सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २७ नोव्हेंबर-रोजी सकाळी १०.३० वाजतापासून ते २८ नोव्हेंबरपर्यंत सकाळी १० वाजतापर्यंत करावे.

सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पद्धतीने व्दितीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत एसएमएस पाठविण्यात येतील.भाविकांनी व्दितीय सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २८ नोव्हेंबर- रोजी सकाळी १०.३० ते २९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करावे.

## पान १ वरून...

### "कुटुंबातील महिलांमध्ये वाद निर्माण...

अशातच आता महाराष्ट्रातील महायुती सरकारची लाडकी बहीण योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक आदर्श योजना ठरली आहे. या योजनेच्या तुलनेत, कर्नाटकातील कॉंग्रेस सरकारने सुरू केलेली गृहलक्ष्मी योजना एका घरातील फक्त एका महिलेलाच लाभ देण्याच्या मर्यादेमुळे टीकेचा विषय ठरली आहे, असे भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.

### निर्भय व मुक्त वातावरणात मतदान...

मतदान प्रक्रियेसंदर्भात अथवा मतदानास उशीर होत असल्यासंदर्भात कोणतीही अफवा पसरवू नये, यासाठी सोशल माध्यमांवर लक्ष ठेवण्याचे निर्देशही केंद्रीय निरीक्षकांनी यावेळी दिले. प्रत्येक मतदान केंद्रांवर पुढील ७२ तास महत्त्वाचे असून अवैध मद्य वाहतूक, अवैध रोकड वाहतूक आदींवर भरारी पथकाने लक्ष ठेवावे, अशा सूचनाही केंद्रीय निरीक्षकांनी यावेळी दिल्या. ठाणे शहर व जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर पुरेशा प्रमाणात सुरक्षा यंत्रणांची तैनात करण्यात आली आहे. तसेच संवेदनशील तसेच गर्दीच्या ठिकाणीही योग्य तो बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मतदान केंद्रांवर तसेच मतदानाच्या रांगेत गर्दी होऊ नये, मतदारांना लवकरात लवकर मत देता यावे, यासाठी मतदान केंद्रातील अधिकाऱ्यांबरोबरच पोलीस यंत्रणाही सर्वतोपरी मदत करणार आहे. संवेदनशील ठिकाणे, गर्दीची ठिकाणे तसेच अरुंद रस्ते असलेल्या ठिकाणी ड्रोन, सीसीटीव्ही, विशेष पथकाद्वारे लक्ष ठेवण्यात येत असल्याचे पोलीस आयुक्त श्री. डुंबरे यांनी यावेळी सांगितले.

ईव्हीएमची वाहतूक तसेच स्ट्रॉंगरूमची सुरक्षा व्यवस्थाही चोखपणे ठेवण्यात आली असून केंद्रीय सुरक्षा यंत्रणांना अर्लट मोडवर राहण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले आहेत.

मतदान केंद्राच्या परिसरात अपुरी जागा असेल तेथे विशेष काळजी घेण्याचे निर्देश यावेळी केंद्रीय निरीक्षकांनी दिले. तसेच गर्दी होणाऱ्या ठिकाणी, जेथे मतदारांची जास्त रांगा लागतात अशा परिसरात ड्रोन कॅमेऱ्याच्या सहाय्याने लक्ष ठेवण्यात यावेत.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ‘बिग बॉस मराठी ४’ फेम अभिनेता निखिल राजेशिर्के अडकला लग्नबंधनात

‘अरुंधती, ‘बायकर्स अड्डा’, ‘छोटी मालकीण’, ‘रंग माझा वेगळा’, ‘माझी तुझी रेशीमगाठ’, ‘असेही एकदा व्हावे’, ‘मूव्हिंग आऊट’, ‘स्वरगंधर्व सुधीर फडके’ अशा मालिका आणि चित्रपटांतून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा अभिनेता म्हणजे निखिल राजेशिर्के(Nikhil Rajeshirke). आता या अभिनेत्याने आयुष्यातील नवीन प्रवासाला सुरुवात केली आहे. आज त्याचा लग्नसोहळा पार पडला. निखिलने चैत्राली मोरे हिच्याबरोबर लग्नगाठ बांधली आहे. ‘राजश्री मराठी’ने निखिलच्या लग्नाची पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. गेल्या काही दिवसांपासून अभिनेत्याच्या लग्नाची चर्चा सुरू असल्याचे पाहायला मिळाले होते.

**‘माझी तुझी रेशीमगाठ’ फेम अभिनेता निखिल राजेशिर्केने बांधली लग्नगाठ**

काही दिवसांपूर्वी त्याने सोशल मीडियावर चैत्रालीबरोबरचा फोटो शेअर करीत ‘चाहूल नव्या




प्रवासाची’ अशी कॅप्शन दिली होती. दुसऱ्या एका पोस्टमध्ये त्याने त्यांच्या प्री-वेडिंग शूटचे काही फोटो शेअर केल्याचे पाहायला मिळाले होते. त्यामध्ये चैत्रालीने लाल रंगाची साडी नेसल्याचे दिसले; तर निखिलने काळ्या रंगाचा सूट घातल्याचे दिसत आहे. त्यांच्या फोटोवर अभिनेत्री आणि ‘रंग माझा वेगळा’ मधील निखिलची सहकलाकार रेश्मा शिंदे हिने हार्ट इमोजी शेअर करीत कमेंट केली आहे. निखिलचा एप्रिल महिन्यात साखरपुडा झाला होता. निखिल राजेशिर्के बिग बॉस मराठीच्या चौथ्या पर्वात सहभागी झाला होता. त्यावेळीदेखील त्याची मोठी चर्चा झाली होती. मात्र, पहिल्याच आठवड्यात तो ‘एलिमिनेट’ झाला होता. निखिलच्या कामाबद्दल बोलायचे, तर त्याने निभावलेल्या सर्वच भूमिकांना प्रेक्षकांचे प्रेम मिळाले. माझी तुझी रेशीमगाठ या मालिकेत त्याने साकारलेल्या अविनाश या पात्राचे मोठे कौतुक झाले. त्याच्या भूमिकेला प्रेक्षकांची मोठी पसंती मिळाल्याचे पाहायला मिळाले. प्रार्थना बेहेरेने नेहा कामतची भूमिका या मालिकेत साकारली होती. नेहाचा पहिला पती अविनाश ही भूमिका त्याने साकारली होती. या मालिकेत श्रेयस तळपदे मुख्य भूमिकेत दिसला होता. तसेच, ‘रंग माझा वेगळा’ मालिकेत त्याने सुजयची भूमिका निभावली होती. आता निखिल कोणत्या प्रोजेक्टमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# अभिनेत्री विशाखा सुभेदारने लेकाच्या वाढदिवसानिमित्ताने लिहिली खास पोस्ट

रमेश चौधरी दिग्दर्शित ‘पाणीपुरी’ या चित्रपटामुळे विशाखा सुभेदार सध्या चर्चेत आहे. १५ नोव्हेंबरला विशाखाचा ‘पाणीपुरी’ चित्रपट प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटात विशाखाने महत्त्वाची भूमिका साकारली आहे. अशातच आज विशाखाचा मुलगा अभिनय सुभेदारचा वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने अभिनेत्रीने सोशल मीडियावर खास पोस्ट लिहिल्या आहेत.

अभिनेत्री विशाखा सुभेदारने मुलाच्या वाढदिवसानिमित्ताने दोन पोस्ट लिहिल्या आहेत. पहिल्या पोस्टमध्ये तिने ‘शुभविवाह’ मालिकेच्या सेटवरील अभिनयचा व्हिडीओ शेअर केला आहे आणि लिहिलं आहे की, जेव्हा आपण एकत्र




‘शुभविवाह’च्या सेटवर काम करायचो. तेव्हा हा व्हिडीओ मी गुपचूप केला होता…मला वाटलं होतं की कामाच्या ठिकाणी फोनवर होतास तू. नंतर तू मला दाखवलं…प्रॉपर्टी काढत होतास ते…बऱ्याचदा असंच होतं की मला वाटतं की पोरगं टंगळ मंगळ करतंय. पण तू फोकस राहून काम करत होतास.

“तू जेव्हा कामात असतोस तेव्हा १०० टक्के कामात आणि आरामात असतोस तेव्हा १०० टक्के आरामात…हे असं राहणं खूप अवघड असतं खरंतर.. पण तुमच्या पिढीला जमत बाई हे असं चिल राहणं आणि तरीही ऑन ऑफ बटण कधी वापरायचं हे देखील तुला माहित आहे…मुळातच खूप बॅलेंस असलेला आहेस तू…असाच राहा…खूप मोठा हो…आणि जे शिकायला परदेशी गेलायस ते सगळं शिक्षण पूर्ण करून, छान अनुभवाने मोठा होऊन ये. देव तुला जे जे हवं ते ते देवो…हेच देवाकडे आईचं मागणं अभिनय सुभेदार वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.. खूप खूप प्रेम अबुली,” असं पहिल्या पोस्टमध्ये विशाखाने लिहिलं आहे.

त्यानंतर विशाखा सुभेदारने मुलगा परदेशी जातानाचा व्हिडीओ शेअर करत लिहिलं आहे, “हॅप्पी बर्थडे अभिनय सुभेदार…जे जे तुला हवं ते ते ईश्वर तुला देवो…परदेशी तुझं स्वामी रक्षण करोत…दत्त म्हणून नेमका सज्जन माणूस तुझ्या पुढ्यात उभा राहो… आईसाहेब वणीस्थानी राहून तुझ्यावर लक्ष ठेवून आहेतच… आणि या आईकडून तुला खूप खूप आशीर्वाद आणि प्रेम.”

दरम्यान, अभिनेत्री विशाखा सुभेदारच्या या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्या आहेत. तसंच तिच्या चाहत्यांनी अभिनय सुभेदारला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

# हिंदी मालिकेच्या सेटवर निशिगंधा वाड यांचा अपघात

मराठी, हिंदी सिनेसृष्टी आणि मालिकाविश्वात आपल्या सहजसुंदर अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या निशिगंधा वाड यांच्याबाबत चिंताजनक वृत्त समोर आलं आहे. ‘कलर्स टीव्ही’वरील ‘सुमन इंदोरी’ या हिंदी मालिकेच्या सेटवर अभिनेत्री निशिगंधा वाड यांचा अपघात झाला आहे. यामुळे मालिकेतील इतर कलाकारांसह क्रूला धक्का बसला आहे. मालिकेतील एका सीनच्या चित्रीकरणादरम्यान निशिगंधा वाड घसरून पडल्या. त्यामुळे त्यांच्या पायाला दुखापत झाली आहे. तातडीने निशिगंधा वाड यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

अभिनेत्री निशिगंधा वाड यांची प्रकृती आता स्थिर आहे. डॉक्टरांनी त्यांना काही दिवसांसाठी आराम करण्याचा सल्ला दिला आहे. तसंच या घटनेनंतर ‘सुमन इंदोरी’ मालिकेच्या प्रॉडक्शन टीमने सुरक्षेच्या कारणास्तव आणि खबरदारीचा उपाय म्हणून चित्रीकरण तात्पुरतं थांबवलं आहे.

निशिगंधा वाड यांच्या अपघाताबाबत प्रॉडक्शन टीममधील एका व्यक्तीने सांगितलं की, हा अनपेक्षित अपघात होता. निशिगंधा मॅडम धोक्याबाहेर असल्यामुळे आम्हाला दिलासा मिळाला आहे. त्या एक फायटर आहेत. त्यांच्या




प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होण्यासाठी आम्ही प्रार्थना करत आहोत. याशिवाय प्रॉडक्शनकडून चाहत्यांना एक आश्वासन देण्यात आलं आहे. भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी सुरक्षा प्रोटोकॉलची अंमलबजावणी केली जाईल.

दरम्यान, ९०च्या दशकापासून अभिनेत्री निशिगंधा वाड प्रेक्षकांचं अविरत मनोरंजन करत आहेत. मराठी आणि हिंदी सिनेसृष्टी आणि मालिकाविश्वात त्या एक नावाजलेल्या अभिनेत्री आहेत. ‘ससुराल सिमर का’, ‘मेरी गुडिया ‘, ‘कभी कभी इत्तेफाक’, ‘रब से है दुआ’ अशा अनेक लोकप्रिय हिंदी मालिकेत त्यांनी महत्त्वाच्या भूमिका निभावल्या आहेत. निशिगंधा यांच्या अपघाताविषयी ऐकताच चाहत्यांना धक्का बसला आहे. त्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करत आहेत.

# घरी बनवलेले मसाले विमान प्रवासात घेऊन जाऊ शकतो का?

**विमानाने लाखो लोक प्रवास करतात. पण, विमानाने प्रवास करताना काही वस्तू घेऊन जाण्यास परवानगी दिली जात नाही. विमानामध्ये कोणत्या गोष्टींना परवानगी आहे किंवा नाही हे एअरलाइन्सच्या नियमांवर अवलंबून असते. त्यामुळे विमान प्रावासात कोणत्या वस्तू घेऊन जायच्या आणि कोणत्या नाही या शंकांवर आम्ही उत्तरे देण्याचा प्रयत्न करीत आहोत.**

यापूर्वी “विमान प्रवासात नारळ घेऊन जाण्यावर का आहे बंदी? वाचा नियम, तोटे अन् तज्ज्ञांचे मत” या बातमीतून आपण विमान प्रवासात नारळ नेण्यास का बंदी आहे हे जाणून घेतले होते. तर आता अलीकडेच अभिनेत्री नीना गुप्ता यांनी सांगितले की, विमान प्रवासात मसाले घेऊन जाण्याससुद्धा बंदी आहे.

अभिनेत्री नीना गुप्ता यांनी इन्स्टाग्रामवर सांगितले, “मी विमानतळावर होते. मी सहसा माझे जेवण स्वतःच बनवते. त्यामुळे माझ्याजवळ असणाऱ्या हॅण्डबॅगमध्ये घरी बनवलेली धणे पावडर असते. पण, विमानतळावर सुरक्षा रक्षकांनी ती जप्त केली. मी त्यांच्याकडे ती परतसुद्धा मागितली. तेव्हा कळले की, विमान प्रवासात मसाले घेऊन जाण्यास बंदी आहे. म्हणून हॅण्डबॅगमध्ये मसाले घेऊन जाऊ नका हे मला तुम्हाला सांगावेसे वाटले.

एव्हिएशन ट्रेनिंग इंडिया, एव्हिएशन तज्ज्ञ राजगोपाल यांच्या मते, नागरी उड्डाण सुरक्षा ब्यूरो (BCAS) ने हॅण्डबॅगमधून मसाल्याच्या पावडर घेऊन जाण्यावर बंदी घातली आहे. तेव्हा याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसने नवी दिल्लीतील राजौरी गार्डन येथील कॉस्मेटिक स्किन क्लिनिकच्या कॉस्मेटोलॉजिस्ट व सौंदर्य चिकित्सक (aesthetic physician) डॉक्टर करुणा मल्होत्रा




यांच्याशी चर्चा केली.

डॉक्टर करुणा मल्होत्रा यांनीसुद्धा या संदर्भात सहमती दर्शवली. त्यांनी सांगितले की, विमान प्रवासात धणे पावडर किंवा कोणत्याची मसाल्याची पावडर घेऊन जाण्यास अनेक कारणांमुळे बंदी घालण्यात आली आहे. मसाल्याची पावडर सुरक्षेबाबतची चिंता वाढवू शकते. कारण- असे पदार्थ स्फोटक पदार्थांसारखे असू शकतात. सुरक्षा कर्मचाऱ्यांना बारीक तपासणीशिवाय इतर पावडरपासून मसाले वेगळे करणे आव्हानात्मक वाटू शकते आणि त्यामुळे स्क्रीनिंग प्रक्रिया मंद होते. त्यामुळे बारीक केलेले पदार्थ सुरक्षा सूचना ट्रिगर करू शकतात. म्हणून अनेक विमान कंपन्यांचे अधिकारी त्यांना कॅरी-ऑन बॅगमध्ये मसाले घेऊन जाण्याची परवानगी देत नाहीत. त्याव्यतिरिक्त मसाल्यांना तीव्र सुगंध असल्यामुळे बंद केबिनसदृश वातावरणात प्रवाशांना अस्वस्थता जाणवू शकते. केबिनमधील अंतर्गत दाबामुळे ते इतर प्रवाशांच्या अंगावरही पडू शकतात आणि त्यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो.

डॉक्टर करुणा मल्होत्रा पुढे म्हणाल्या की, “मसाल्याच्या उग्र वासामुळे इतर प्रवाशांमध्ये ॲलर्जी किंवा संवेदनशीलता निर्माण होऊ शकते. तसेच तुमच्या शेजारी बसणाऱ्या प्रवाशाला कदाचित मसाले आवडत नसतील , तर त्या कारणास्तव सामान्यतः हॅण्डबॅगमधून मसाले घेऊन जाण्यावर बंदी घातली जाते आणि प्रवाशांना सहसा ते तपासलेल्या सामानात पॅक करण्याचा सल्ला दिला जातो, जेथे ते सहप्रवाशांची गैरसोय होऊ न देता कसून तपासणी करू शकतात”. “तसेच मसाला हे शस्त्र म्हणून किंवा इतर प्रवाशांना धमकावण्यासाठीही वापरले जाऊ शकते”, असा दावा एव्हिएशन तज्ज्ञ राजगोपाल यांनी केला.

# आरोग्यवर्धक आहे ‘हे’ टोमॅटो

बरेच जण टोमॅटो घातल्याशिवाय भाजीची कल्पना देखील करू शकत नाही. प्रत्येक भाजीमध्ये टोमॅटो असतोच असतो. टोमॅटो खाणं आरोग्यासाठी चांगलं मानलं जातं. त्यामुळे कित्येक लोक फक्त भाजीच नाही तर टोमॅटोचं सूप, सॅलड, ज्यूस म्हणूनही वापर करतात. आपण रोजच्या भाज्यांमध्ये फक्त लाल टोमॅटोचा वापर करतो. परंतु तुम्हाला माहिती आहे काय? बाजारात मिळणारं हिरवं टोमॅटो आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हिरव्या टोमॅटोमध्ये पोटॅशियम, प्रोटीन, कॅल्शियम, फॉस्फरस, व्हिटॅमिन के, बीटा केरोटीन, मॅग्नेशियम, अँटिऑक्सिडंट्स सारखे पोषक घटक असतात. रक्तदाब, सर्दी, फ्लू, रोगप्रतिकार शक्ती वाढवण्याकरिता हिरवं टोमॅटो उपयुक्त आहे. याशिवाय डोळ्यांचं आरोग्य चांगलं ठेवण्याकरिता हिरवं टोमॅटो



उत्तम आहे.

**रोगप्रतिकार शक्ती वाढवते :** हिरव्या टोमॅटोमध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन सी आढळते. यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते. तसंच यात पुरेशा प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स असतात. रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी हे उपयुक्त आहे. यामुळे तुम्ही सर्दी, फ्लू आणि इतर आजारांपासून दूर राहू शकता.

**डोळ्यासाठी फायदेशीर :** डोळ्याच्या आरोग्यासाठी हिरवं टोमॅटो उपयुक्त आहेत. हिरव्या टोमॅटोमध्ये बीटा कॅरोटीन पुरेशा प्रमाणात आढळतात. यामुळे डोळ्याचं आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते. तसंच हिरव्या टोमॅटोच्या सेवनामुळे दृष्टी दोष दूर होवू शकतो. त्याचबरोबर डोळ्यासंबंधित इतर आजारांवर देखील हिरवे टोमॅटो रामबाण आहेत.

**बद्धकोष्ठतेसाठी फायदेशीर :** टोमॅटोमध्ये मुबलक प्रमाणात पाणी असते. जे दीड ग्रॅम फायबर पोषक तत्त्व प्रदान करतात. तसंच हिरव्या टोमॅटोमध्ये अघुलनशील आणि विरघळणार असे दोन्ही संयुगे आढळतात. यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. परिणामी बद्धकोष्टतेची समस्या दूर होते.

**बीपी :** हिरव्या टोमॅटोमध्ये पोटॅशियम जास्त आणि सोडीयम कमी प्रमाणात असते. यामुळे रक्तवाहिन्या खुलतात. परिणामी रक्ताभिसरण क्रिया सुरळीत होवून रक्तदाब नियंत्रणात राहतं.

**त्वचेसाठी चांगलं :** वाढत्या प्रदूषणामुळे त्वचेचं संरक्षण करायंच असेल तर हिरवे टोमॅटो उपयुक्त आहेत. यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेसंबंधित समस्या दूर होवू शकते.

## राशी भविष्य




**मेष** – विरोधात गेलेले लोक परत तुमचेच कौतुक करतील. धंद्यात वाढ होईल. नोकरीत वरिष्ठांना खूश कराल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

**वृषभ** – महत्त्वाच्या कामांचा पाठपुरावा करावा. आर्थिक नियोजन उत्तम ठरेल. प्रवासात घाई करू नका. कुटुंबासमवेत वेळ घालवाल.

**मिथुन** – घरातील समस्या सोडवता येतील. किरकोळ कारणाने तणाव होऊ शकतो. महत्त्वाच्या आर्थिक योजनांचा आपणास लाभ होईल.

**कर्क** – कुटुंबाशी निगडित एखादा महत्त्वाचा निर्णय घेऊ शकाल. राहत्या घराचे प्रश्न सोडवू शकाल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**सिंह** – व्यवसायामध्ये अनुकूल ग्रहमान राहील. घरातील व्यक्तीबरोबर क्षुल्लक मतभेद होतील. आपण एखादा धाडसी निर्णय घ्याल.

**कन्या** – वाटाघाटी यशस्वी होतील. आपला राग आवरावा. कुटुंबासमवेत आनंदी वेळ घालवू शकाल. शक्यतो अनावश्यक खर्च टाळावा.

**तूळ** – कोर्ट केसमध्ये यशस्वी व्हाल. महत्त्वाची स्पर्धा जिंकाल. महत्त्वाकांक्षी योजना राबवू शकाल. आर्थिक नियोजन जपून करावे.

**वृश्चिक** – व्यवसायाशी निगडित महत्त्वाचे निर्णय योग्य ठरतील. धंद्यात वाढ होईल. मैत्रीत वाद उद्भवू शकतो. प्रकृतीची काळजी घ्यावी.

**धनु** – खंबीरपणे समस्या सोडवाल. घर, वाहन घेण्याचा विचार कराल. नोकरीत वरिष्ठ शाबासकी देतील. अधिकारांचा अतिरेक करू नका.

**मकर** – ठरवलेल्या कामात क्षुल्लक अडचण येऊ शकते. मोठे निर्णय घेऊ शकाल. नोकरीमध्ये समाधानकारक वातावरण राहील.

**कुंभ** – प्रयत्न आणि नशिबाच्या साथीने कठीण काम पूर्ण कराल. प्रेमाला चालना मिळेल. घरातील ज्येष्ठांची काळजी घ्यावी लागेल.

**मीन** – कोर्टाच्या कामात नम्रता ठेवा. यश मिळेल. सहकाऱ्यांशी सलोख्याने वागावे. प्रवासाचे योग संभवतात. वाणीवर नियंत्रण ठेवा.

# व्हीव्हीपॅटवर आक्षेप घेताना सावधान




**वर्धा (नितीन देवळेकर) :** व्हीव्हीपॅट म्हणजे व्होटर व्हेरिफाइड पेपर ऑडिट ट्रेल. एखाद्या मतदाराने ज्या उमेदवाराला मतदान केले आहे, खरंच त्याच उमेदवाराला मत गेलं की नाही, याची खातरजमा करण्यासाठी मतदान केंद्रांमध्ये व्हीव्हीपॅट मशीनचा वापर करण्यात येतो; मात्र एखाद्या मतदाराने यावर आक्षेप घेतला आणि ते खोटे ठरले तर अशा मतदाराला सहा महिने कारावास आणि १ हजार रुपये दंडाची तरतूद निवडणूक आयोगाकडून होऊ शकते. त्यामुळे मतदार बंधूंनी आक्षेप घेताना सावधान ! अन्यथा ते अंगलट येण्याचा धोका नाकारता येत नाही.

राज्य विधानसभा निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडणार आहे. त्यासाठी सर्व विधानसभा मतदारसंघांतील प्रत्येक मतदान केंद्रांवर व्हीव्हीपॅट मशीनचा वापर करण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिकांची निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासार्हता वाढावी आणि ईव्हीएम मशीनबद्दल सर्वसामान्य माणसाच्या मनातील संशय दूर करण्यासाठी मतदाराने ईव्हीएम मशीनवर त्याच्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावासमोरचं बटण दाबल्यानंतर त्याचे मत त्याच उमेदवाराला गेले की नाही याची पडताळणी करण्यासाठी व्हीव्हीपॅट मशीनचा वापर करण्यात येतो.

यात उमेदवाराच्या नावासमोरचं बटण दाबल्यानंतर त्याचवेळी उमेदवाराचे नाव, क्रमांक आणि चिन्ह यांचा उल्लेख असलेली व्हीव्हीपॅट स्लिप मशीनमध्ये सात सेकंदापर्यंत मतदाराला दिसते. त्यानंतर आपोआप ती स्लीप कट होऊन बीप वाजतो आणि ती स्लीप सीलबंद पेटीत जमा होते; परंतु एखाद्या मतदाराला आपण ज्या उमेदवाराला मतदान केले, त्या उमेदवाराऐवजी वेगळ्याच उमेदवाराची चिठ्ठी मशीनमध्ये दिसली अशी शंका आल्यास असा मतदार आक्षेप घेऊ शकतो.

# येरवड्यातील चार गुंडांना तडीपार करण्याचे आदेश




**पुणे (सुचिता देशमुख) :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येरवडा भागातील चार सराइतांना शहर, जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी दिले. वनराज महेंद्र जाधव (वय २१), यशराज आनंद इंगळे (वय २३ ), हिमालय ऊर्फ गोलु मिटु बिश्त (वय २१, तिघे रा. लक्ष्मीनगर, येरवडा) आणि मयुर विष्णु गुंजाळ (वय २६, रा शनीआळी, येरवडा) अशी तडीपार केलेल्या सराइतांची नावे आहे.

वनराज जाधव टोळीप्रमुख आहे. जाधव, इंगळे, बिश्त, गुंजाळ यांच्याविरुद्ध खून, दहशत माजविणे, तोडफोड, शस्त्र बाळगणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. जाधवसह साथीदारांना पुणे, पिंपरी-चिंचवड शहर, तसेच जिल्ह्यातून तडीपार करण्यात यावे, असा प्रस्ताव येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके, पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर, स्वाती खेडकर, उपनिरीक्षक महेश फटांगरे, उपनिरीक्षक सुर्वे यांनी तयार केला. पोलीस अधीक्षक मनोज पाटील, उपायुक्त हिम्मत जाधव यांनी प्रस्तावाला मंजुरी दिली. त्यानंतर जाधव याच्यासह चौघांना शहरातून तडीपार करण्याचे आदेश देण्यात आले.

# वीजतज्ज्ञ प्रताप होगाडे यांचे निधन

**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण) :** महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष, वीजतज्ज्ञ प्रताप होगाडे यांचे सोमवारी इचलकरंजी येथे निधन झाले. समाजवादी पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष पदावर होगाडे होते. तथापि त्यांची बहुतांशी राजकीय कारकीर्द ही जनता दलामध्ये घडली.



अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली. उमेदीच्या काळामध्ये त्यांनी इचलकरंजी को-ऑपरेटिव्ह सिमेंट कंपनी, साधना सहकारी बँक, इचलकरंजी टेक्सटाइल, प्राईड इंडिया टेक्स्टाईल पार्क आदी विविध सहकारी संस्थांची स्थापना केली. जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीमध्ये ते सहभागी झाले होते. पुढे त्यांनी जनता दलाच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात काम करायला सुरुवात केली. या पक्षाचे ते प्रदेश उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, प्रधान महासचिव अशी विविध पदे त्यांनी भूषवली होती. इचलकरंजी विधानसभा निवडणुकी त्यांनी या पक्षाकडून लढवली होती. अलीकडेच त्यांनी समाजवादी पक्षामध्ये प्रवेश केला होता. या पक्षाचे राज्य कार्याध्यक्ष म्हणून ते काम पाहत होते.

गेली तीस वर्षे ते वीज क्षेत्रामध्ये सक्रिय होते. या क्षेत्राचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. एनरोन विरोधी लढा, विजेचे वाढते दर, त्यासाठी वीज नियामक आयोग, राज्य शासन, महावितरण यांच्याशी दिलेला लढा, उच्च न्यायालय – सर्वोच्च न्यायालयापर्यंत दाखल केलेले दावे, विजेचे सामान्य नागरिक, उद्योजकांचे प्रश्न सोडवण्यासाठी केलेला पाठपुरावा यामुळे त्यांची प्रतिमा राज्यभर उंचावली गेली. त्यातूनच त्यांच्याकडे वीजतज्ज्ञ म्हणून पाहिले जात होते. या कामाची दखल घेऊन त्यांना विविध सामाजिक संस्थांनी अनेक पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. इचलकरंजीच्या सामाजिक कार्यात त्यांनी मोठे योगदान दिले. येथील मनोरंजन मंडळ उभारणीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. या मंडळाचे वर्षभर सातत्याने गुणवत्तापूर्ण उपक्रम होत असतात.

SPORT

# Cheteshwar Pujara Is Back! Turns Commentator For Border- Gavaskar Trophy

**New Delhi -** The Border-Gavaskar Trophy is just around the corner, and this time, India's Test stalwart Cheteshwar Pujara will be taking on a different role.

Known for his resilience and grit as a batter, Pujara will step into the commentary box for Star Sports, bringing his insights and experience to this much-anticipated series.

Here are some commentators who did commentary for BGT 2023:

Ravi Shastri, Sunil Gavaskar,Murali Karthik,Dinesh Karthik,Ajit Agarkar,Harsha Bhogle,Matthew Hayden,Sanjay Manjrekar, Jatin Sapru, Irfan Pathan, Padamjeet Sehrawat, Sanjay Bangar, Deep Dasgupta.

Pujara, often referred to as the 'New Wall' of India's Test lineup, has been a cornerstone at the crucial No. 3 position for over a decade. He has played more than 100 Test matches, amassing over 7,000 runs.

His disciplined and patient approach made him indispensable in India's red-ball cricket. However, the No. 3 position has




now been entrusted to the younger Shubman Gill, a dynamic batter who has shown great promise but is still finding his footing in the role Pujara once made his own.

One of Pujara's most memorable performances came during the 2018-19 tour of Australia. Scoring 521 runs, including three centuries and a fifty, he was instrumental in India's historic first Border-Gavaskar Trophy victory on Australian soil and was named Player of the Series.

In the 2020-21 series, while his 271 runs were modest, his marathon innings wore down the Australian bowlers, playing a pivotal role in India's triumph. Cheteshwar Pujara is the fourth Indian batter to score highest runs against Australia in tests.

Despite his immense contributions, Pujara has been sidelined since the team management opted for Gill in his place. His last Test appearance came in the 2023 World Test Championship final against Australia.

Though his absence from the playing XI marks the end of an era, Pujara's transition to commentary ensures his presence will continue to enrich the cricketing landscape, offering fans a deeper understanding of the game during this high-octane series.

# 'Ashwin An Incredibly Smart Bowler Who Learns And Adapts Very Quickly', Says Nathan Lyon



**New Delhi -** The upcoming Border-Gavaskar Trophy will see the resumption of the battle of off-spinners between Ashwin and Lyon. The duo made their Test debuts in the same year and have comfortably gone past 500-wicket mark in the longer format.

"Ash is an incredible bowler. I've gone head-to-head with him for basically my whole career, so I've learned a lot from Ash. He's an incredibly smart bowler, and he's able to learn and adapt very quickly, and I think the best bowlers in the world are able to do that."

"He used his skill to benefit himself and his team. So you've got to give credit where credit's due, he was the best bowler (in 2020/21), as he usually is. So hats off to Ash," said Lyon to Fox Cricket.

He also revealed the learnings he's taken from seeing Ashwin up and close in action. "He's taught me a lot. I'm a big believer in the players that you play against are your best coaches that you eventually come across.

I've watched a lot of his footage heading over to India, the way he goes about it here in Australia, see if I can pick up anything."

"The way I look at cricket is that I've never met anyone who has conquered the game, never played against or with anyone who's conquered the game. There's so much to learn in this great game, and there's so much for me to learn off Ash.

He's a world-class bowler. He's taken over 500 Test match wickets, and he should be extremely proud of that." "I know Jadeja reads all of this stuff, so I can't really share all my secrets.

My big thing is spinning up the back of the ball and getting bounce, but it's a hard craft to be able to do that in Australia. Your size for error is extremely small." Lyon signed off by brushing aside queries on when he or Ashwin will call it quits from the game.

# Should Indian Team Travel to Pakistan? Kapil Dev's RAZOR Sharp Take

**New Delhi -** Kapil Dev's ramrod straight take take amid speculation around will the Indian team travel to Pakistan for the Champions Trophy or not.

The former India captain when asked about should the Indian team travel to Pakistan or not said that it is a call that would be taken by the government of India and not by the Board of Control of Cricket in India (BCCI).

"It's the government's responsibility. People like us should not give opinions, our opinions don't matter. Kapil Dev can't be bigger than anyone else," said Kapil Dev.

Meanwhile, cities in Pakistan Occupied Kashmir (PoK) found no mention in the Champions Trophy tour unveiled by the ICC on Saturday as the world body moved in swiftly to have them dropped from the host country's itinerary following India's strong objection.

The Trophy Tour will now comprise Karachi, Rawalpindi and Islamabad, apart from Abbottabad in the Khyber Pakhtunwala Region.

The Trophy Tour starts in Islamabad, the capital city of Pakistan, and will travel to other cities of the nation -- Taxila and Khanpur (November 17), Abbottabad (November 18), Murree (November 19) and Nathia Gali (November 20) before concluding in Karachi (November 22-25). Most of these cities are tourist attractions, Earlier, on November 14, the PCB



had announced the Trophy Tour, which included cities like Skardu, Hunza and Muzaffarabad, which fall in the PoK region, a disputed territory between India and Pakistan.

Following the Trophy Tour in Pakistan, it will tour Afghanistan (November 26-28), followed by Bangladesh (December 10-13), South Africa (December 15-22), Australia (December 25-January 5), New Zealand (January 6-11), England (January 12-14) and India (January 15-26).

The cities for the Trophy Tour outside Pakistan will be announced in due course.

"A series of physical and digital engagements traversing iconic destinations, sporting events and key battles in the international cricket calendar form the Trophy Tour schedule, during which fans will also be treated to a content series titled 'Champion on Tour' that will document the Trophy Tour's journey around the world through the lens of food, music and cricket," ICC said in a release.

# Hockey India Men's Junior Asia Cup Squad Announced, Amir Ali To Lead

**New Delhi -** Hockey India on Monday announced the 20-member squad for the Men's Junior Asia Cup, a qualifying event for the FIH Hockey Junior World Cup 2025, to be held in Muscat, Oman from November 26 to December 4.

India has won this tournament for a record four times, including 2023, 2015, 2008 and 2004. They beat nemesis Pakistan 2-1 in the final last year to lift the title. This year, the event will see 10 teams from the continent divided into two pools with India, Chinese Taipei, Japan, Korea and Thailand in pool A and Bangladesh, Malaysia, China, Oman and Pakistan in Pool B.

Although India qualifies for the FIH Hockey Junior World Cup by virtue of being the hosts, the team under coach PR Sreejesh will be vying to carry on their momentum from their recent success at the Sultan of Johor Cup where they finished on the podium.

The Indian side side will be led by Amir Ali and Rohit will be his deputy. Goalkeepers Princedeep Singh and Bikramjit Singh will guard the post for India while defenders Amir Ali, Talem Priyobar-




ta, Shardanand Tiwari, Yogember Rawat, Anmol Ekka and Rohit have been named in the squad.

Midfielders Ankit Pal, Manmeet Singh, Rosan Kujur, Mukesh Toppo, Thokchom Kingson Singh and forwards Gurjot Singh, Sourabh Anand Kushwaha, Dilraj Singh, Arshdeep Singh and Araijeet Singh Hundal. Meanwhile, Sukhvinder and Chandan Yadav have been named as alternate players.

"The Sultan of Johor Cup was a first-time experience for many of the players, yet they showed great spirit in doing well and I am quite pleased with how they performed. The team will be taking confidence from that performance and will be working towards a successful outing in the Junior Asia Cup.

The players have been putting in a lot of hard work at the ongoing national camp in SAI, Bengaluru and we have made certain changes to our game to be more effective in defence and efficient in converting goals," expressed coach and former India goalie Sreejesh.

Goalkeepers: Princedeep Singh, Bikramjit Singh Defenders: Amir Ali (C), Talem Priyobarta, Shardanand Tiwari, Yogember Rawat, Anmol Ekka, Rohit (VC) Midfielders: Ankit Pal, Manmeet Singh, Rosan Kujur, Mukesh Toppo, Thokchom Kingson Singh Forwards: Gurjot Singh, Sourabh Anand Kushwaha, Dilraj Singh, Arshdeep Singh, Araijeet Singh Hundal AP Athletes: Sukhvinder, Chandan Yadav

# मुंबई विद्यापीठाचे ढिसाळ नियोजन, तांत्रिक अडचणींची मालिका; परीक्षेला उशीर; 'पेट' परीक्षेत गोंधळ

● मुंबई, राकेश गायकवाड :

मुंबई : पीएच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा म्हणजेच 'पेट' वर्षातून एकदा घेणे अपेक्षित असताना मुंबई विद्यापीठाने दोन वर्ष उलटल्यानंतर रविवारी घेतली. मात्र या परीक्षेदरम्यान विद्यापीठाच्या ढिसाळ नियोजनाचा आणि तांत्रिक अडचणींच्या मालिकेचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागला. परिणामी, तांत्रिक बिघाडामुळे डोंबिवलीतील एका परीक्षा केंद्रावरील 'पेट' आणि 'एलएलएम' प्रवेशपूर्व परीक्षा रविवार, २४ नोव्हेंबर रोजी घेण्याची नामुष्की विद्यापीठावर ओढावली आहे. तसेच तांत्रिक बिघाडामुळे विविध केंद्रांवरील 'पेट' दोन ते तीन तास उशीराने सुरू झाली. विद्यापीठाच्या ढिसाळ नियोजनामुळे विद्यार्थ्यांना मन:स्ताप सहन करावा लागला असून समाजमाध्यमांवर विद्यापीठावर टीकेचे ताशेरे ओढले गेले.

मुंबई विद्यापीठातर्फे 'पेट' सकाळच्या सत्रात १०.३० ते दुपारी १२.३० या दोन तासाच्या कालावधीत, तर 'एलएलएम' प्रवेशपूर्व परीक्षा दुपारी ३ ते ४ या एक तासाच्या कालावधीत घेणे नियोजित होते. त्यासाठी परीक्षार्थींना परीक्षेच्या १ तास आधी संबधित परीक्षा केंद्रांवर उपस्थित राहणे बंधनकारक असल्यामुळे 'पेट'साठी विद्यार्थी सकाळी ९.३० वाजताच परीक्षा केंद्रांवर पोहोचले. ही परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाने एका खासगी कंपनीला कंत्राट दिले होते. मात्र संबंधित कंपनी व विद्यापीठाचे ढिसाळ नियोजन विद्यार्थ्यांनी अनुभवले.

**विद्यार्थ्यांचा संताप**

कांदिवलीतील परीक्षा केंद्राबाहेर विद्यार्थ्यांनी 'भारतीय शिक्षणपद्धतीचा निषेध असो' अशी घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला. मुंबई विद्यापीठाने स्वत:च्या यंत्रणेमार्फत परीक्षा का घेतली नाही? खासगी कंपनीला का कंत्राट दिले? खासगी इन्स्टिट्यूट परीक्षा केंद्र म्हणून का ठेवण्यात आली? असे प्रश्न विद्यार्थ्यांकडून उपस्थित करण्यात आले.


**प्रशासनाने काय म्हटले**

दरम्यान, खासगी कंपनीच्या यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे काही केंद्रांवर परीक्षा उशीरा सुरु झाली. मात्र विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी वाढीव वेळ देण्यात आला', असे मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी स्पष्ट केले.

– 'पेट'साठी अर्ज केलेल्या ५ हजार ५५४ विद्यार्थ्यांपैकी ३ हजार ४६२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आणि १ हजार ५६६ विद्यार्थी अनुपस्थित होते. तसेच 'एलएलएम' प्रवेशपूर्व परीक्षेसाठी अर्ज केलेल्या ५ हजार ७७ विद्यार्थ्यांपैकी ३ हजार ६६१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आणि ८९२ विद्यार्थी अनुपस्थित होते.

डोंबिवलीतील सुरेखा इन्फोटेक या परीक्षा केंद्रावर तांत्रिक कारणामुळे ५२६ विद्यार्थ्यांची 'पेट' आणि ५२४ विद्यार्थ्यांची 'एलएलएम' प्रवेशपूर्व परीक्षा होऊ शकली नाही. त्यामुळे फक्त डोंबिवलीतील केंद्रावरील परीक्षार्थींसाठी रविवार,२४ नोव्हेंबर रोजी 'पेट' आणि 'एलएलएम' प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात येईल. या विद्यार्थ्यांना परीक्षेचे ठिकाण आणि वेळ हे सुधारीत प्रवेश पत्राच्या (हॉल तिकिट) माध्यमातून स्वतंत्ररित्या लॉगिन व ई-मेलद्वारे कळविण्यात येईल, अशी माहिती मुंबई विद्यापीठ प्रशासनाने दिली.

**खासगी यंत्रणेचा भोंगळ कारभार**



'पेट' आणि 'एलएलएम' प्रवेशपूर्व परीक्षेची जबाबदारी असणाऱ्या खासगी यंत्रणेने महाविद्यालयाऐवजी एका संगणक क्लासमध्ये परीक्षा घेतल्याचे आढळून आले आहे. या भोंगळ कारभाराची कसून चौकशी करुन संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी. तसेच या ढिसाळ नियोजनाची नैतिक जबाबदारी स्वीकारून कुलगुरु किंवा परीक्षा नियंत्रकांनी राजीनामा द्यावा', असे ठाकरे गटाच्या युवा सेनेचे अधिसभा सदस्य प्रदीप सावंत यांनी सांगितले. तर या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून मुंबई विद्यापीठाने दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी शिंदे गटाच्या युवा सेनेचे उपसचिव ॲड. सचिन पवार यांनी केली आहे.

**विविध अडथळ्यामुळे विद्यार्थ्यांची मन:स्थिती ढासळली**

'पेट' सकाळच्या सत्रात १०.३० वाजता सुरु होणे अपेक्षित होते. परंतु मुंबई विद्यापीठाच्या ढिसाळ नियोजनामुळे काहींची ११.१५, ११.३०., १२.१५, १२.३० अशा विविध वेळेत परीक्षा सुरू झाली. एकाही विद्यार्थ्याची हजेरी व्यवस्थित घेतली गेली नाही. अनेक संगणकांमध्ये तांत्रिक बिघाड होता. बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित असणाऱ्या या परीक्षेत उत्तरांचे काही पर्यायही चुकीचे होते. या परीक्षेसाठी अडथळ्यांचा सामना करावा लागल्यामुळे विद्यार्थ्यांची मन:स्थिती ढासळली', असे कांदिवलीतील एका केंद्रावरील विद्यार्थिनीने सांगितले.

**मूलभूत सोयीसुविधांचा अभाव**

'पेट' सकाळी १०.३० वाजता सुरु होणार होती, मात्र आम्हाला सकाळी ९.३० वाजता बोलवून १०.१५ वाजता प्रवेशद्वाराच्या आत घेतले. सर्व विद्यार्थी परीक्षा वर्गात जाईपर्यंत ११ वाजले. काही ठिकाणी बैठक क्रमांकच लिहिले नसल्यामुळे कोणी कुठेही बसत होते. इंटरनेट व सर्व्हर दोन्ही डाऊन होते. 'पेट' १५ मिनिटांत सुरु होईल, असे म्हणेपर्यंत दुपारचे ३ वाजले मात्र परीक्षा काही झाली नाही. परीक्षेच्या वर्गात पाण्याची व्यवस्था नव्हती. ५० ते ६० विद्यार्थी बसणाऱ्या वर्गात २ पंखे होते. वातानुकूलित यंत्रणा व्यवस्थित कार्यरत नव्हती. डोंबिवलीतील परीक्षा केंद्रावर दुपारच्या दरम्यान मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिवांनी भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध प्रश्नांचा भडिमार करत त्यांना जाब विचारला', असे एका विद्यार्थ्याने सांगितले

> ■ डोंबिवलीतील सुरेखा इन्फोटेक केंद्रावरील पेट परीक्षाचा पेपर काही तांत्रिक कारणामुळे वेळेत सुरू झाला नाही. तांत्रिक बिघाड सोडविण्याचे काम जलदगतीने सुरू आहे. इतर सर्व २० केंद्रांवर सुरळीत परीक्षा सुरू झाली आहे. सुरेखा इन्फोटेक केंद्रावरील सर्व परीक्षार्थींना तांत्रिक बिघाड दुरुस्त झाला की परीक्षा देता येणार आहे. त्यांना वेळ वाढवून दिली जाईल. विद्यार्थी लॉगिन करतील त्या वेळेपासून पेपर सोडविण्याची आणि संपण्याची वेळ निश्चित करण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षार्थींनी चिंता करू नये.
>
> **- लीलाधर बनसोड, जनसंपर्क अधिकारी, मुंबई विद्यापीठ.**

**डोंबिवली केंद्रावरील परीक्षा पुढील रविवारी घेण्याची नामुष्की**

विद्यापीठांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पूर्वपात्रता (पेट) ऑनलाइन परीक्षा वेळेत सुरू न झाल्याने डोंबिवलीतील केंद्रावरही गोंधळ उडाला होता.

डोंबिवली एमआयडीसीतील सुरेखा एन्फोटेक हे परीक्षा केंद्र मुंबई विद्यापीठाकडून निश्चित करण्यात आले होते. या परीक्षा केंद्रावर रविवारी सकाळी साडेदहा वाजता घेण्यात येणारी पेट परीक्षा तांत्रिक कारणामुळे वेळेत सुरू झाली नाही. सकाळी साडेदहा वाजता सुरू होणारा पेपर साडेअकरा वाजले तरी सुरू न झाल्याने परीक्षार्थी प्राध्यापकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

तांत्रिक कारणामुळे पेपर सुरू होण्यास उशीर होत असल्याची माहिती परीक्षार्थींना परीक्षा पर्यवेक्षकांकडून देण्यात येत होती. यामुळे विद्यार्थी अस्वस्थ झाले होते. या प्रकारामुळे केंद्रावर गोंधळही उडाला होता.

अखेरीस तांत्रिक बिघाडामुळे डोंबिवलीतील एका परीक्षा केंद्रावरील 'पेट' आणि 'एलएलएम' प्रवेशपूर्व परीक्षा रविवार, २४ नोव्हेंबर रोजी घेण्याची नामुष्की विद्यापीठावर ओढावली.

**सर्व्हर डाऊन**

मुंबईसह, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक आदी विविध भागांतून तसेच काही विद्यार्थी परराज्यातूनही ही परीक्षा देण्यासाठी महाराष्ट्रात आले होते. मात्र कांदिवलीतील ठाकूर महाविद्यालय असो किंवा डोंबिवलीतील सुरेखा इन्फोटेक आदी विविध केंद्रांवर सर्व्हरच डाऊन झाले. त्यामुळे विविध परीक्षा केंद्रांवर गोंधळाचे वातावरण होते.

**प्रशासनाने काय म्हटले**

खासगी कंपनीच्या यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे काही केंद्रांवर परीक्षा उशीरा सुरु झाली. मात्र विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी वाढीव वेळ देण्यात आला', असे मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी स्पष्ट केले.

'पेट'साठी अर्ज केलेल्या ५ हजार ५५४ विद्यार्थ्यांपैकी ३ हजार ४६२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आणि १ हजार ५६६ विद्यार्थी अनुपस्थित होते. तसेच 'एलएलएम' प्रवेशपूर्व परीक्षेसाठी ५ हजार ७७ विद्यार्थ्यांपैकी ३ हजार ६६१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ८९२ विद्यार्थी अनुपस्थित होते.

---

## जळगावात अपक्ष उमेदवाराच्या घरावर गोळीबार!

● जळगाव , सचिन कदम :



जळगावमध्ये अपक्ष उमेदवाराच्या घरावर पहाटे गोळीबार झाल्याची माहिती पुढे आली आहे. अहमद हुसैन शेख असे या उमेदवाराचे नाव आहे. सोमवारी पहाटे ते झोपले असताना अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या घरावर ३ राऊंड फायर केल्याचे सांगण्यात येत आहे.

विधानसभा निवडणूकीला अवघे दोन दिवस शिल्लक आहेत. सोमवारी सायंकाळपर्यंत सर्वच पक्षांच्या प्रचारतोफा थंडावणार आहेत. मात्र, अशातच जळगावमध्ये एका अपक्ष उमेदवाराच्या घरावर गोळीबार झाल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. अहमद हुसैन शेख हे झोपेत असताना हा गोळीबार झाला. दरम्यान, हल्लेखोर फरार असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे.

---

## शहरात ज्येष्ठ नागरिकांच्या फसवणुकीचे सत्र कायम, सिंहगड रस्ता, कोंढवा भागातील घटना

● पुणे, अभिजीत येरल्लू :

पादचारी ज्येष्ठ नागरिकांकडे बतावणी करुन चोरट्यांनी त्यांच्याकडील ऐवज चोरून नेल्याच्या घटना सिंहगड रस्ता आणि कोंढवा भागात घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

सिंहगड रस्त्यावरील नवशा मारुती मंदिर परिसरात चोरट्यांनी बतावणी करुन एका ज्येष्ठ महिलेकडील सोन्याचे दागिने आणि रोकड असा ५५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने पर्वती




पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला गणेशमळा परिसरात राहायला आहेत. त्या शनिवारी दुपारी एकच्या सुमारास सिंहगड रस्त्यावरील नवशा मारुती मंदिर परिसरातून निघाल्या होत्या. त्यावेळी दोन चोरट्यांनी त्यांना अडवले. ज्येष्ठ महिलांना मोफत साडी आणि पैशांचे वाटप करण्यात येत असल्याची बतावणी चोरट्यांनी त्यांच्याकडे केली. तुमच्याकडील दागिने आणि रोकड काढून पिशवीत ठेवा, असे चोरट्यांनी त्यांना सांगितले. त्यानंतर चोरट्यांनी महिलेला बोलण्यात गुंतविले. महिलेचे लक्ष नसल्यची संधी साधून चोरट्यांनी पिशवीतील दागिने आणि रोकड असा ऐवज चोरुन नेला. पोलीस उपनिरीक्षक पवार तपास करत आहेत.

कोंढवा भागातील टिळेकरनगर परिसरात एका ज्येष्ठ नागरिकाकडील बतावणी करुन चोरट्यांनी त्यांच्याकडील ८० हजार रुपयांची सोनसाखळी चोरुन नेल्याची घटना घडली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ज्येष्ठ नागरिक टिळेकरनगर भागातून निघाले होते. श्री ज्वेलस सोसायटीसमोर चोरट्यांनी त्यांना अडवले. चोरट्यांनी त्यांच्याकडे हनुमान मंदिर कोठे आहे, अशी विचारणा केली. माझ्या मावशीचा मृत्यू झाला आहे. सूतक असल्याने मंदिरात जाऊ शकत नाही. दोन हजार रुपये दान करायचे आहे, अशी बतावणी केली. चोरट्यांनी त्यांना पाचशे रुपयांच्या चार नोटा दिल्या. तुमच्या गळ्यातील सोनसाखळी नोटेला लावा, असे चोरट्यांनी त्यांना सांगितले.

---

## आगीत दोन घरांसह गोठा जळून खाक; ८ शेळ्यांचा मृत्यू, संसाराची राखरांगोळी

● नांदेड, प्रथमेश चव्हाण :

नांदेडच्या अर्धापूर तालुक्यातील लहान तांडा येथे आज सकाळच्या सुमारास दोन घराला आणि गोठ्याला आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीच्या घटनेत आठ शेळ्यांचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर अन्नधान्य आणि संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे.

नांदेडच्या अर्धापूर तालुक्यातील लहान तांडा येथे आज सकाळी दोन घराला अचानक आग लागली. आगीने अचानक रौद्र रूप धारण करत जवळ असलेल्या गोठ्याला आग लागली होती. कैलास राठोड आणि ललिताबाई आडे असे या आगीत नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे नाव आहे. घरांना अचानक आग लागल्याने गावात एकच धावपळ सुरु झाली. ग्रामस्थांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आग नियंत्रणात आली नाही. यामुळे दोन्ही घरांसह गोठा पूर्णपणे जळून खाक झाला होता.

---

## बाणगंगा येथील पुरातन पायऱ्यांची पुन्हा दुर्दशा; कामाच्या दर्जावर स्थानिकांचे प्रश्नचिन्ह

● मुंबई, विशाल पाटील :

दक्षिण मुंबईतील वाळकेश्वर येथील ऐतिहासिक अशा बाणगंगा तलावाच्या पायऱ्या बसवताना कामाचा दर्जा राखला जात नसल्याचा आरोप स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. या तलावाच्या पायऱ्या बसवण्यासाठी विटांच्या चुऱ्याचा वापर करण्यात येत असल्याची एक ध्वनिचित्रफीत समाजमाध्यमांवर फिरत आहे. तलावाच्या पायऱ्यांचे नुकसान केल्यामुळे आधीच्या कंत्राटदाराला निलंबित केले असताना पुन्हा तीच गत असल्याबद्दल या क्षेत्रातील



तज्ज्ञांनीही नाराजी व्यक्त केली आहे.

बाणगंगा तलावाच्या पुनरुज्जीवनाचा प्रकल्प मुंबई महानगरपालिकेने हाती घेतला आहे. अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे तलावाच्या पायऱ्या, पायऱ्यांचे दगड, दीपस्तंभांची दुरवस्था झाली होती. तसेच तलाव परिसरातील पायऱ्यांवरील बांधकामे झाली होती. त्यामुळे महाराष्ट्र राज्य शासनाच्या निर्देशानुसार मुंबई महानगरपालिकेने बाणगंगा तलाव व परिसर पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेतला आहे. मात्र आधीच्या कंत्राटदाराने तलावातील गाळ काढताना पायऱ्यांचे नुकसान केले होते. त्यामुळे कंत्राटदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता व त्याचे कंत्राटही रद्द करण्यात आले होते. त्यानंतर पालिकेने नव्याने निविदा काढण्याचे ठरवले होते. तेव्हापासून बाणगंगा तलावाचे काम ठप्प झाले होते. मात्र या तलावाच्या पायऱ्यांचे काम सुरू असतानाची एक ध्वनिचित्रफीत समाजमाध्यमांवर फिरत आहे. त्यामुळे या कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**विटांच्या चुऱ्याचा वापर**

सामाजिक कार्यकर्ते झोरू भतेना यांनी ही ध्वनिचित्रफीत समाजमाध्यमांवर टाकली आहे. त्यात बाणगंगा तलावाच्या पुरातन पायऱ्या बसविताना विटांच्या चुऱ्याचा वापर करताना एक कामगार दिसत आहे. याबद्दल सामाजिक कार्यकर्त्यांनी समाजमाध्यमांवर नाराजी व्यक्त केली आहे. बाणगंगा ही पुरातन वास्तू असून त्याच्या कामासाठी कोणी सल्लागार नेमला आहे की नाही, त्याची काही जबाबदारी आहे की नाही, असा सवाल पुरातन वास्तुतज्ज्ञ भरत गोठोसकर यांनी केला आहे.

**महापालिका आयुक्तांच्या सूचनांचे पालन का नाही?**

बाणगंगा परिसर आणि या ठिकाणची मंदिरे यांच्याशी संबंधित कामांमध्ये योग्य आदर ठेवला जाणे अपेक्षित आहे.

---

## शेतात दारूचा साठा सापडला, आरोप प्रत्यारोप सूरू

● वर्धा, नितीन देवळेकर :

निवडणूक विविध प्रकारे गाजू लागली आहे. त्यामुळे मतदारांना विविध माध्यमातून प्रभावित करण्याचे प्रकार होतात. दारू, पैसे वाटप, पार्ट्या यास उधाण येते. आता सर्वत्र गाजत असलेल्या आर्वी मतदारसंघात मोठ्या प्रमाणात दारू साठा सापडल्याने खळबळ उडाली आहे.

आर्वीलगत शिरपूर खडकी येथील अश्विन शेंडे यांच्या शेतात हा साठा दिसून आला. पोलिसांनी पहाटे दोन वाजता धाड टाकून हा साठा जप्त केला. या कारवाईवेळी खासदार अमर काळे पण उपस्थित झाले. त्यांनी आरोप केला की हा साठा आम्हीच पकडून दिला असून तो भाजपने मतदारांना प्रभावित करण्यासाठी आणला. शेतमालक हे भाजपचे कार्यकर्ते आहेत. पोलिसांनी वेळीच दखल घेतली असती तर दारू सोबतच पैसाही दिसून आला असता. पण पोलिसांनी वेळेवर कारवाई केली नाही असा आमचा आरोप आहे. आता तरी उचित




कारवाई करीत दोषींना शासन करावे असे खासदार काळे म्हणाले. तर भाजपने हा आरोप फेटाळून लावला आहे. भाजपचे उमेदवार सुमित वानखेडे म्हणाले की या निवडणुकीपूर्वी म्हणजे मी उभा नसतांनाही हे असे प्रकार झाले आहेत. मतदानाच्या तोंडावर असे करण्यात कोणाचा हातखंडा आहे, हे इथले ज्येष्ठ मतदार सांगतील. मला हे करण्याचे कारणच नाही. तरी पण पोलीस व निवडणूक प्रशासनाने काय योग्य ती कारवाई करावी, आमचे सहकार्य राहिलच.

---

## मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल नायजेरियातील मराठी भाषिकांनी मानले पंतप्रधान मोदींचे आभार

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. त्यानंतर जगभरातील मराठी भाषिकांकडून सरकारच्या या निर्णयाचं स्वागत करण्यात येत आहे. दरम्यान, आता नायजेरियातील मराठी भाषिकांनीही पंतप्रधान मोदी यांचे आभार मानले आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली. "मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल नायजेरियातील मराठी भाषिकांनी आनंद व्यक्त केला. ते त्यांच्या संस्कृती आणि मुळांशी ज्या पद्धतीने जोडले गेलेत, ते पाहणे अतिशय कौतुकास्पद आहे" असं त्यांनी या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन दिवसांच्या



नायजेरिया दौऱ्यावर आहेत. ते नायजेरियात पोहोचताच तेथील मराठी भाषिकांनी त्यांचे जोरदार स्वागत केलं. तसेच त्यांना पत्र देत मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. भारत सरकारने मराठीचा अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. हा निर्णय मराठी भाषिकांसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. या निर्णयामुळे मराठी साहित्य आणि संस्कृतीला प्रोत्साहन मिळेल. असं त्यांनी या पत्रात म्हटलं आहे.

दरम्यान, दोन दिवसांच्या नायजेरियाच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान मोदींनी रविवारी नायजेरियाचे राष्ट्रपती महामहिम बोला अहमद तिनुबू यांची भेट घेतली. यावेळी द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यावर दोघांमध्ये चर्चा झाली. महत्त्वाचे म्हणजे यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर' या नायजेरियाच्या दुसऱ्या सर्वोच्च राष्ट्रीय सन्मानाने सन्मानित करण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, मी नायजेरिया सरकार आणि नायजेरियाच्या जनतेचे मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच हा सन्मान १४० कोटी भारतीयांना आणि भारत आणि नायजेरिया यांच्यातील घनिष्ठ मैत्रीला समर्पित करतो. हा पुरस्कार आम्हाला दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्यासाठी प्रेरणा देत राहील, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदी यांनी दिली.